# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

मानव विज्ञान विद्याशाखा

(FACULTY OF HUMANITIES)

पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती (CBCS) अभ्यासक्रम २०२३ - २४

## अभ्यासक्रमिका

वाङ्मय स्नातक

सत्र ३ व ४

मराठी (आवश्यक) द्वितीय भाषा DSC-2

आणि

मराठी वाङ्मय (ऐच्छिक) DSC-3

PROSPECTUS

OF

BACHELOR OF ARTS

SEMESTAR – 3 & 4

MARATHI (Compulsory Second Language)

&

LITERATURE OF THE MODERN LANGUAGE - MARATHI (MLT)

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**

पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती (CBCS) अभ्यासक्रम २०२३ - २४

**विद्याशाखा : मानव विज्ञान (Faculty - Humanities)**

**बी. ए. भाग - २ सत्र - ३**

**विषय : मराठी (आवश्यक) द्वितीय भाषा DSC -2**

| विषय सांकेतांक / Subject Code | विषयाचे नाव / Name of Subject | एकूण तासिका (४८ मिनिटांची एक तासिका याप्रमाणे) / Total Number of Periods | श्रेयांक / Credits |
|---|---|---|---|
| १०११ | मराठी (आवश्यक) द्वितीय भाषा DSC -2 | ६० तासिका | ३.२ |

अभ्यासपत्रिकेसाठी नेमलेले संपादित पाठ्यपुस्तक – **'शब्दगंध'** भाग -२ (सत्र - ३ व सत्र - ४)
प्रकाशक : राघव पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर.

प्रस्तुत अभ्यासपत्रिकेच्या 'शब्दगंध' या क्रमिक पुस्तकात वैचारिक, ललित, कविता व कौशल्य विकास आधारित अभ्यासक्रम (उपयोजित मराठी) हे चार विभाग समाविष्ट केले असून अंतर्गत मूल्यमापन हा घटक देखील अभ्यासक्रमात आहे. या अभ्यासपत्रिकेची फलनिष्पत्ती पुढीलप्रमाणे असेल –

**अभ्यासपत्रिकेची फलनिष्पत्ती (COs) :**

१. वैचारिक लेखांमधून विद्यार्थ्यांना लोकशाही मूल्यांची जपणूक करण्याचा संस्कार व विचार मिळेल. महापुरुषांचे विचार व कार्य समजून घेता येईल. त्यांच्या जीवन आणि विचारांपासून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल.
२. ललित व कविता या विभागांतून गतकालीन आणि सममकालीन जगण्याचे प्रश्न समजून घेण्यासाठी उपयुक्त असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळेल.
३. कौशल्य विकास आधारित अभ्यासक्रम (उपयोजित मराठी) हा विभाग विद्यार्थ्यांना विविध प्रकारची कौशल्ये आत्मसात करण्यासाठी मार्गदर्शक ठरेल. विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना हा अभ्यास घटक मार्गदर्शक व सहायक ठरेल.
४. वैचारिक, ललित, कविता आणि कौशल्य विकास आधारित अभ्यासक्रम (उपयोजित मराठी) या चार विभागांतील घटकांचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांना संवाद कौशल्ये, भाषिक कौशल्ये, लेखन कौशल्ये आत्मसात करता येतील. लोकशाही मूल्यांची जपणूक करण्याची तत्त्वनिष्ठा त्यांचे अंगी निर्माण होईल. मराठी भाषेचे जतन, संवर्धन करण्याची प्रेरणा त्यांना मिळेल. ही भाषिक कौशल्ये विद्यार्थ्यांना रोजगारक्षम करण्यासाठी सहायक ठरतील.

| अ.क्र. (Sr. No.) | घटक (Topic) | अध्यापन तासिका (Teaching Hours) |
|---|---|---|
| **विभाग - अ** | **वैचारिक** | १५ तासिका |
| १) | संस्कृती आणि साहित्य - साने गुरुजी | |
| २) | सावित्रीबाई फुले आणि ताराबाई शिंदे - सदानंद मोरे | |
| ३) | सुधारक वृत्तीचा जाणता राजा - अरुणा ढेरे | |
| **विभाग - ब** | **ललित** | १५ तासिका |
| १) | लढे हा विदर्भ - मधुकर केचे | |
| २) | सांबराचे लोटण - मारुती चितमपल्ली | |
| ३) | महालूट - सदानंद देशमुख | |
| **विभाग - क** | **कविता** | १५ तासिका |
| १) | संतवाणी अ) ताटीचे अभंग - संत मुक्ताबाई,<br>ब) फुलाचे अंगा सुवास असे - संत चोखामेळा | |
| २) | अखंड - म. जोतीराव फुले | |
| ३) | धनी गेला ! - पां. श्रा. गोरे | |
| ४) | जमाना - नारायण कुळकर्णी कवठेकर | |
| ५) | स्टेज - वाहरू सोनवणे | |
| ६) | गुढी - आत्माराम किसन सोनोने | |
| **विभाग- ड** | **कौशल्य विकास आधारित अभ्यासक्रम** (उपयोजित मराठी ) | १५ तासिका |
| | **मराठी भाषिक कौशल्ये विकास** : संपादक - डॉ. पृथ्वीराज तौर, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, या पुस्तकातील पुढील दोन घटकांचा समावेश केला आहे.<br>१) मराठी भाषा कौशल्ये आणि व्यवसायाच्या संधी - सुनीता सांगोले<br>२) अहवाल लेखन - स्वाती दामोदरे | |
| | | **एकूण ६० तासिका** |

| बी. ए. भाग - २ सत्र - ३ विषय - मराठी (आवश्यक) द्वितीय भाषा |
|---|

**गुण विभागणी**

| एकूण गुण - १००, लेखी परीक्षा - ८० गुण, वेळ - ३ तास | अंतर्गत मूल्यमापन - २० गुण |
|---|---|

अभ्यासक्रमासाठी नेमलेले संपादित पाठ्यपुस्तक - **'शब्दगंध'** भाग -२ (सत्र - ३ व सत्र - ४)
राघव पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर

| | | |
|---|---|---|
| विभाग – अ | वैचारिक | - २० गुण |
| विभाग - ब | ललित | - २० गुण |
| विभाग – क | कविता | - २० गुण |
| विभाग – ड | कौशल्य विकास आधारित अभ्यासक्रम (उपयोजित मराठी) | - २० गुण |

**प्रश्ननिहाय गुणविभागणी :-**

| | |
|---|---|
| **विभाग 'अ' व 'ब'** : १४ गुणांचा प्रत्येकी एक दीर्घोत्तरी प्रश्न | - २८ गुण |
| **विभाग 'क'** : ०८ गुणांचे दोन लघुत्तरी प्रश्न | - १६ गुण |
| **विभाग 'ड'** : ०८ गुणांचे दोन लघुत्तरी प्रश्न | - १६ गुण |
| वस्तुनिष्ठ बहुपर्यायी २० प्रश्न, प्रत्येकी - ०१ गुण | - २० गुण |

(**वस्तुनिष्ठ प्रश्न** - विभाग 'अ' व 'ब' यावर प्रत्येकी ०६ प्रश्न आणि विभाग 'क' व 'ड' यावर प्रत्येकी ०४ प्रश्न असे एकूण २० बहुपर्यायी प्रश्न विचारले जातील. प्रत्येक प्रश्नास ०१ गुण याप्रमाणे हा प्रश्न २० गुणांचा असेल.)

**कौशल्य विकासावर आधारित / Skill Enhancement Module (SEM) अंतर्गत मूल्यमापन (Internal) :२० गुण**

गुण विभागणी

| | |
|---|---|
| १) गृहपाठ | - १० गुण |
| २) मौखिक परीक्षा | - १० गुण |

**सूचना :-** विद्यार्थ्यांना गृहपाठ देतांना पुढील मुद्याचा आधार घ्यावा.

(१) नेमलेल्या वैचारिक अभ्यासक्रमाच्या आधारे समकालीन प्रश्नांवर टिपण तयार करा.
(२) नेमलेल्या वैचारिक अभ्यासक्रमाच्या आधारे भाषण तयार करा.
(३) वृत्तांत लेखन व अहवाल लेखनाचा आराखडा तयार करा.
(४) मौखिक परीक्षा ही गृहपाठावर आधारित असेल.

| * विद्यार्थ्यांना परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी लेखी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन मिळून किमान ४० गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. |
|---|

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती (CBCS) अभ्यासक्रम २०२३ - २४

**विद्याशाखा : मानव विज्ञान (Faculty – Humanities)**

**बी. ए. भाग - २ सत्र - ४**

**विषय : मराठी (आवश्यक) द्वितीय भाषा DSC -2**

| विषय सांकेतांक / Subject Code | विषयाचे नाव / Name of Subject | एकूण तासिका (४८ मिनिटांची एक तासिका याप्रमाणे) / Total Number of Periods | श्रेयांक / Credits |
|---|---|---|---|
| १०११ | मराठी (आवश्यक) द्वितीय भाषा DSC -2 | ६० तासिका | ३.२ |

अभ्यासपत्रिकेसाठी नेमलेले संपादित पाठ्यपुस्तक - **'शब्दगंध'** भाग -२ (सत्र - ३ व सत्र - ४)
प्रकाशक : राघव पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर.

प्रस्तुत अभ्यासपत्रिकेच्या 'शब्दगंध' या क्रमिक पुस्तकात वैचारिक, ललित, कविता व कौशल्य विकास आधारित अभ्यासक्रम (उपयोजित मराठी) हे चार विभाग समाविष्ट केले असून अंतर्गत मूल्यमापन हा घटक देखील अभ्यासक्रमात आहे. या अभ्यासपत्रिकेची फलनिष्पत्ती पुढीलप्रमाणे असेल –

**अभ्यासपत्रिकेची फलनिष्पत्ती (COs) :**

१. वैचारिक लेखांमधून विद्यार्थ्यांना लोकशाही मूल्यांची जपणूक करण्याचा संस्कार व विचार मिळेल. महापुरुषांचे विचार व कार्य समजून घेता येईल. त्यांच्या जीवन आणि विचारांपासून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल.

२. ललित व कविता या विभागांतून गतकालीन आणि सममकालीन जगण्याचे प्रश्न समजून घेण्यासाठी उपयुक्त असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळेल.

३. कौशल्य विकास आधारित अभ्यासक्रम (उपयोजित मराठी) हा विभाग विद्यार्थ्यांना विविध प्रकारची कौशल्ये आत्मसात करण्यासाठी मार्गदर्शक ठरेल. विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना हा अभ्यास घटक मार्गदर्शक व सहायक ठरेल.

४. वैचारिक, ललित, कविता आणि कौशल्य विकास आधारित अभ्यासक्रम (उपयोजित मराठी) या चार विभागांतील घटकांचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांना संवाद कौशल्ये, भाषिक कौशल्ये, लेखन कौशल्ये आत्मसात करता येतील. लोकशाही मूल्यांची जपणूक करण्याची तत्त्वनिष्ठा त्यांचे अंगी निर्माण होईल. मराठी भाषेचे जतन, संवर्धन करण्याची प्रेरणा त्यांना मिळेल. ही भाषिक कौशल्ये विद्यार्थ्यांना रोजगारक्षम करण्यासाठी सहायक ठरतील.

| अ.क्र. (Sr. No.) | घटक (Topic) | अध्यापन तासिका (Teaching Hours) |
| --- | --- | --- |
| **विभाग - अ** | **वैचारिक** | १५ तासिका |
| १) | आद्य समाज सुधारक : महात्मा बसवेश्वर - अशोक मेनकुदळे | |
| २) | आगरकरांचे धर्मचिंतन - भा. ल. भोळे | |
| ३) | खरे आव्हान विचारांचे - गोविंद पानसरे | |
| **विभाग - ब** | **ललित** | १५ तासिका |
| १) | पुस्तकांनी आयुष्याला आकार दिला - श्रीराम लागू , अनुवाद - सारंग दर्शने | |
| २) | नोटांवर उतरतोय गर्भाचा गोळा - उत्तम कांबळे | |
| ३) | गांधारी काशीबाई - इंद्रजित भालेराव | |
| **विभाग - क** | **कविता** | १५ तासिका |
| १) | संतवाणी अ) चहुकडे देवा दाटला वणवा - संत निर्मळा,<br>ब) पतितपावन म्हणविसी आधी - संत कान्होपात्रा | |
| २) | घन:शाम सुंदरा - होनाजी बाळा | |
| ३) | वेदाआधी तू होतास - बाबुराव बागूल | |
| ४) | व्यवहार - वसंत आबाजी डहाके | |
| ५) | उभी जिंदगानी - श्रीकृष्ण राऊत | |
| ६) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर - अशोक पळवेकर | |
| **विभाग- ड** | **कौशल्य विकास आधारित अभ्यासक्रम (उपयोजित मराठी )** | १५ तासिका |
| | **मराठी भाषिक कौशल्ये विकास** : संपादक - डॉ. पृथ्वीराज तौर, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, या पुस्तकातील पुढील दोन घटकांचा समावेश केला आहे.<br>१) कार्यक्रमाचे आयोजन - निधी पटवर्धन<br>२) मराठी वृत्तांत लेखन - विद्या सुर्वे- बोरसे | |
| | | **एकूण ६० तासिका** |

| बी. ए. भाग - २ सत्र - ४ विषय - मराठी (आवश्यक) द्वितीय भाषा |
|---|

**गुण विभागणी**

| एकूण गुण - १००, लेखी परीक्षा - ८० गुण, वेळ - ३ तास | अंतर्गत मूल्यमापन - २० गुण |
|---|---|

अभ्यासक्रमासाठी नेमलेले संपादित पाठ्यपुस्तक - **'शब्दगंध'** भाग -२ (सत्र - ३ व सत्र - ४),
राघव पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर

| | | |
|---|---|---|
| विभाग – अ | वैचारिक | - २० गुण |
| विभाग - ब | ललित | - २० गुण |
| विभाग – क | कविता | - २० गुण |
| विभाग – ड | कौशल्य विकास आधारित अभ्यासक्रम (उपयोजित मराठी) | - २० गुण |

**प्रश्ननिहाय गुणविभागणी :-**

| | |
|---|---|
| **विभाग 'अ' व 'ब'** : १४ गुणांचा प्रत्येकी एक दीर्घोत्तरी प्रश्न | - २८ गुण |
| **विभाग 'क'** : ०८ गुणांचे दोन लघुत्तरी प्रश्न | - १६ गुण |
| **विभाग 'ड'** : ०८ गुणांचे दोन लघुत्तरी प्रश्न | - १६ गुण |
| वस्तुनिष्ठ बहुपर्यायी २० प्रश्न, प्रत्येकी - ०१ गुण | - २० गुण |

(**वस्तुनिष्ठ प्रश्न** - विभाग 'अ' व 'ब' यावर प्रत्येकी ०६ प्रश्न आणि विभाग 'क' व 'ड' यावर प्रत्येकी ०४ प्रश्न असे एकूण २० बहुपर्यायी प्रश्न विचारले जातील. प्रत्येक प्रश्नास ०१ गुण याप्रमाणे हा प्रश्न २० गुणांचा असेल.)

**कौशल्य विकासावर आधारित / Skill Enhancement Module (SEM) अंतर्गत मूल्यमापन (Internal) :२० गुण**

गुण विभागणी

| | |
|---|---|
| १) गृहपाठ | - १० गुण |
| २) मौखिक परीक्षा | - १० गुण |

**सूचना** :- विद्यार्थ्यांना गृहपाठ देतांना पुढील मुद्याचा आधार घ्यावा.

(१) अभ्यासक्रमात नेमलेल्या वैचारिक व ललित घटकांच्या आधारे समकालीन प्रश्नांवर टिपण तयार करा.
(२) कार्यक्रमाची रूपरेषा तयार करा.
(३) आपल्या परिसरातील वृत्तपत्रांसाठी बातम्या, जाहिराती, वृत्तलेख व ललित लेख यांचे नमुने तयार करून प्रकल्प सादर करावा.
(४) मौखिक परीक्षा ही गृहपाठावर आधारित असेल.

| * विद्यार्थ्यांना परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी लेखी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन मिळून किमान ४० गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. |
|---|

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती (CBCS) अभ्यासक्रम २०२३ - २४

**विद्याशाखा : मानव विज्ञान (Faculty - Humanities)**

**बी.ए. भाग - २ सत्र - ३**

**विषय : मराठी वाङ्मय (ऐच्छिक) DSC - 3**

| विषय सांकेतांक / Subject Code | विषयाचे नाव / Name of Subject | एकूण तासिका (४८ मिनिटांची एक तासिका याप्रमाणे ) / Total Number of Periods | श्रेयांक / Credits |
|---|---|---|---|
| १०५२ | मराठी वाङ्मय (ऐच्छिक) DSC -3 | ७५ तासिका | ४ |

प्रस्तुत अभ्यासपत्रिकेसाठी नेमलेल्या 'दृष्टांतवैभव' व 'कथावैभव' या संपादित पुस्तकांच्या सूक्ष्म अभ्यासातून विद्यार्थ्यांना प्राचीन व अर्वाचीन मराठी कथन साहित्याची ओळख होईल, मराठी भाषेच्या परंपरेचे व विकासाचे ज्ञान होईल. या अभ्यासपत्रिकेची फलनिष्पत्ती पुढीलप्रमाणे असेल –

**अभ्यासक्रमाची विशिष्ट / नेमकी फलनिष्पत्ती (PSOs) :**

१. या अभ्यासक्रमातील साहित्यकृतींच्या आकलन, आस्वाद व मूल्यमापनातून विद्यार्थ्यांना ललितसाहित्य या वाङ्मय प्रकाराच्या सामाजिक सांस्कृतिक फलश्रुतीची जाणीव होईल. समाजाच्या प्रभावामुळे साहित्यकृती निर्माण होत असते तसेच साहित्यकृतींतील विचारांच्या प्रभावातून प्रगतिशील समाजाची जडणघडण होत असते ही प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजेल.

२. भाषा आणि साहित्य समाजाचे सांस्कृतिक भरणपोषण करीत असते. भाषा आणि साहित्यामुळे संस्कृतीचे व अभिरुचीचे संवर्धन आणि नवनिर्माण होत असते. समाज, संस्कृती, प्रदेश यांच्या संवर्धन आणि नवनिर्माणासाठी भाषेचे जतन आणि साहित्याची निर्मिती आवश्यक असते याची जाणीव विद्यार्थ्यांना होईल.

३. भाषा आणि साहित्याच्या आकलन आस्वादनातून संवाद कौशल्ये, लेखन कौशल्ये आत्मसात करून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम होता येईल.

**अभ्यासपत्रिकेची फलनिष्पत्ती (COs) :**

**अ) दृष्टांतवैभव (केशिराज संकलित दृष्टांतपाठातील निवडक ४० दृष्टांत)**

१) 'दृष्टांतवैभवा' तून महानुभाव पंथाच्या सामाजिक, सांस्कृतिक, भाषाविषयक कार्याचा व प्राचीन मराठी गद्य वाङ्मयाचा परिचय होईल.

२) महानुभाव पंथाच्या वाङ्मय अभ्यासातून तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक प्रश्नांचे आकलन होईल.

३) 'दृष्टांतवैभवा' या पुस्तकाच्या अभ्यासातून लोकव्यवहार व भाषा व्यवहार यांचे ज्ञान होईल.

४) महानुभाव पंथाच्या वाङ्मय अभ्यासातून तत्कालीन सामाजिक व्यवस्थेचे आकलन होईल.

५) महानुभाव पंथाच्या वाङ्मय अभ्यासातून तत्कालीन भाषिक मूल्यांचा अभ्यास करता येईल.

६) हा अभ्यास विद्यार्थ्यानां प्राचीन मराठी साहित्यकृतींचे संशोधन, जतन व संवर्धन करण्यासाठी प्रेरक ठरेल.

७) या अभ्यासामुळे विद्यार्थ्यांना समकाळात दृष्टांत लेखनाची आणि अल्पाक्षरी पण आशयपूर्ण लेखनाची प्रेरणा मिळेल.

**ब) कथावैभव (अर्वाचीन कालखंडातील निवडक कथा)**

१) **कथावैभव** या संपादित पुस्तकाच्या सूक्ष्म अभ्यासातून विद्यार्थ्यांना कथेच्या विविध प्रकारांची माहिती होईल.

२) कथांच्या आकलन, आस्वाद व मूल्यमापनातून विद्यार्थ्यांना समकालीन सांस्कृतिक, सामाजिक पर्यावरणाचे ज्ञान होईल.

३) कथांचा आभ्यास विद्यार्थ्यांना सामाजिक मूल्यांची जाणीव देणारा ठरेल.

४) सामाजिक प्रश्नांची जाणीव कथा साहित्याच्या माध्यमातून होईल.

५) कथा लेखनाचे तंत्र विद्यार्थ्यांना आत्मसात करता येतील.

६) कथात्म साहित्यातून वाचन, लेखन, श्रवण ही कौशल्ये आत्मसात करता येतील.

७) कथेचे सादरीकरण व निवेदनकौशल्य विद्यार्थ्यांना प्राप्त होतील.

८) कथांमधून प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे व्यक्त झालेल्या लोकशाही मूल्याचा संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर होईल.

९) नेमलेल्या साहित्यकृतीच्या आधारे कथा घटकांचे आकलन होऊन कथा लेखनाची प्रेरणा मिळेल.

| अ.क्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | अध्यापन तासिका (Teaching Hours) |
|---|---|---|
| १ | **दृष्टांतवैभव (केशिराज संकलित दृष्टांतपाठातील निवडक ४० दृष्टांत)**<br>संपादक - डॉ. अजय देशपांडे, डॉ. अण्णा वैद्य<br>ज्ञानपथ पब्लिकेशन्स, अमरावती. | एकूण – ७५ तासिका |
| २ | **कथावैभव (अर्वाचीन कालखंडातील निवडक कथा)**<br>संपादक - डॉ. गणेश मालटे, डॉ. गजानन मुंदे, डॉ. राजेश मिरगे<br>राघव पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर.<br>('कथावैभव' मधील क्रमांक १ ते ६ या कथा अभ्यासक्रमात राहतील.) | |
| ३ | 'दृष्टांतवैभव' व 'कथावैभव' यावर आधारित कौशल्य विकास<br>(Skill Enhancement Module) | |

| बी. ए. भाग - २ सत्र - ३ विषय - मराठी वाङ्मय (ऐच्छिक) |
|---|

**गुण विभागणी**

| एकूण गुण - १००, लेखी परीक्षा - ८० गुण, वेळ - ३ तास | अंतर्गत मूल्यमापन - २० गुण |
|---|---|

अ) 'दृष्टांतवैभव' - ४० गुण
ब) 'कथावैभव' - ४० गुण

**प्रश्ननिहाय गुणविभागणी :-**

प्रश्न १ - संदर्भासह स्पष्टीकरण - २० गुण
('दृष्टांतवैभव' व 'कथावैभव' यांवर प्रत्येकी ०५ गुणांचे प्रत्येकी दोन संदर्भ विचारले जातील.)
प्रश्न २ - दृष्टांतवैभव : ०१ दीर्घोत्तरी प्रश्न - १२ गुण
प्रश्न ३ - दृष्टांतवैभव : ०१ लघुत्तरी प्रश्न - ०८ गुण
प्रश्न ४ - कथावैभव : ०१ दीर्घोत्तरी प्रश्न - १२ गुण
प्रश्न ५ - कथावैभव : ०१ लघुत्तरी प्रश्न - ०८ गुण
प्रश्न ६ - वस्तुनिष्ठ बहुपर्यायी २० प्रश्न प्रत्येकी - ०१ गुण - २० गुण
(वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांमध्ये 'दृष्टांतवैभव' यावर १० प्रश्न, 'कथावैभव' यावर १० प्रश्न विचारले जातील.)

**कौशल्य विकासावर आधारित अंतर्गत मूल्यमापन (Skill Enhancement Module) - २० गुण**

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या वाचन, लेखन कौशल्यांचा विकास करण्यासाठी पुढील मुद्यांच्या आधारे विद्यार्थ्यांकडून SEM (Skill Enhancement Module) तयार करून घ्यावे. SEM तपासून गुणदान करावे.

१) अभ्यासक्रमात नेमलेल्या दृष्टांतांचे विद्यार्थ्यांनी वाचन करून त्यातील बोधवाक्ये, सुभाषितसदृश वाक्ये शोधणे, या वाक्यांचे विश्लेषण प्रकल्प वहीत लिहून आणावे.
२) अभ्यासक्रमात नेमलेल्या दृष्टांतांच्या आधारे मध्ययुगीन काळातील मराठी भाषेतील लुप्त झालेल्या शब्दांचा शोध घेऊन सूची
प्रकल्प वहीमध्ये तयार करावी.
३) अभ्यासक्रमात नेमलेल्या 'दृष्टांतवैभव' या पुस्तकातील लोककथांचे विद्यार्थ्यांनी आजच्या मराठी प्रमाणभाषेत प्रकल्प वहीमध्ये
लेखन करावे.
४) अभ्यासक्रमात नेमलेल्या 'कथावैभव' या पुस्तकातील कथांमधील म्हणी, वाक्प्रचार यांचे विद्यार्थ्यांनी संकलन करून प्रकल्प वहीत लिहून आणावे .
५) अभ्यासक्रमातील दृष्टांत व कथांचा अभ्यास करून विद्यार्थ्यांनी तसाच एखादा दृष्टांत किंवा कथा लिहून आणावी.

**गुण विभागणी** SEM प्रकल्प वही - १० गुण, SEM वर आधारित मौखिक परीक्षा - १० गुण.

| * विद्यार्थ्यांना परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी लेखी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन मिळून किमान ४० गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. |
|---|

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती (CBCS) अभ्यासक्रम २०२३ - २४

**विद्याशाखा : मानव विज्ञान (Faculty - Humanities)**

**बी.ए. भाग - २ सत्र - ४**

**विषय : मराठी वाङ्मय (ऐच्छिक) DSC - 3**

| विषय सांकेतांक / Subject Code | विषयाचे नाव / Name of Subject | एकूण तासिका (४८ मिनिटांची एक तासिका याप्रमाणे ) / Total Number of Periods | श्रेयांक / Credits |
|---|---|---|---|
| १०५२ | मराठी वाङ्मय (ऐच्छिक) DSC -3 | ७५ तासिका | ४ |

प्रस्तुत अभ्यासपत्रिकेसाठी नेमलेल्या 'मन निरभ्र व्हावं' व 'कथावैभव' (संपादित) या पुस्तकांच्या सूक्ष्म अभ्यासातून विद्यार्थ्यांना अर्वाचीन मराठी कथन साहित्याची ओळख होईल, अर्वाचीन मराठी भाषा व्यवहाराचे ज्ञान होईल. या अभ्यासपत्रिकेची फलनिष्पत्ती पुढीलप्रमाणे असेल –

**अभ्यासक्रमाची विशिष्ट / नेमकी फलनिष्पत्ती (PSOs) :**

१. या अभ्यासक्रमातील साहित्यकृतीच्या आकलन, आस्वादनातून विद्यार्थ्यांना ललित साहित्य या वाङ्मय प्रकाराच्या सामाजिक सांस्कृतिक फलश्रुतीची जाणीव होईल. समाजाच्या प्रभावामुळे साहित्यकृती निर्माण होत असते तसेच साहित्यकृतींतील विचारांच्या प्रभावातून प्रगतिशील समाजाची जडणघडण होत असते ही प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजेल.

२. भाषा आणि साहित्य समाजाचे सांस्कृतिक भरणपोषण करीत असते. भाषा आणि साहित्यामुळे संस्कृतीचे अभिरुचीचे संवर्धन आणि नवनिर्माण होत असते. समाज, संस्कृती, प्रदेश यांच्या संवर्धन आणि नवनिर्माणासाठी भाषेचे जतन आणि साहित्याची निर्मिती आवश्यक असते याची जाणीव विद्यार्थ्यांना होईल.

३. भाषा आणि साहित्याच्या आकलन आस्वादनातून संवाद कौशल्ये, लेखन कौशल्ये आत्मसात करून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम होता येईल.

**अभ्यासपत्रिकेची फलनिष्पत्ती (COs) :**

**अ) मन निरभ्र व्हावं** – डॉ. आ. ह. साळुंखे

१) मन निरभ्र व्हावं - या पुस्तकाच्या सूक्ष्म अभ्यासातून विद्यार्थ्यांना ललित गद्य या वाङ्मय प्रकाराच्या स्वरूपाचे आकलन होईल.

२) ललित लेखांमधून जीवनाच्या विविध अंगाचे दर्शन घडेल.

३) सामाजिक मूल्यांची जाणीव ललित लेखांच्या माध्यमातून होईल.

४) लालित्यपूर्ण लेखांमुळे भाषेची जाण वृद्धिंगत होईल.

५) ललित लेखनाचे तंत्र विद्यार्थ्यांना आत्मसात करता येतील.

६) ललित साहित्यातून वाचन, लेखन, श्रवण ही कौशल्ये आत्मसात करता येतील.

७) ललित लेखनाचे सादरीकरण व  निवेदनकौशल्ये विद्यार्थ्यांना प्राप्त होतील.

८) नेमलेल्या साहित्यकृतीच्या आधारे ललित लेखनाच्या घटकांचे आकलन होऊन ललित लेखनाची प्रेरणा मिळेल.

**ब) कथावैभव (अर्वाचीन कालखंडातील निवडक कथा)**

१) **कथावैभव** या संपादित पुस्तकाच्या सूक्ष्म अभ्यासातून विद्यार्थ्यांना कथेच्या विविध प्रकारांची माहिती होईल.

२) कथांच्या आकलन, आस्वाद व मूल्यमापनातून विद्यार्थ्यांना समकालीन सांस्कृतिक, सामाजिक पर्यावरणाचे ज्ञान होईल.

३) कथांचा आभ्यास विद्यार्थ्यांना सामाजिक मूल्यांची जाणीव देणारा ठरेल.

४) सामाजिक प्रश्नांची जाणीव कथा साहित्याच्या माध्यमातून होईल.

५) कथा लेखनाचे तंत्र विद्यार्थ्यांना आत्मसात करता येतील.

६) कथात्म साहित्यातून वाचन, लेखन, श्रवण ही कौशल्ये आत्मसात करता येतील.

७) कथेचे सादरीकरण व निवेदनकौशल्य विद्यार्थ्यांना प्राप्त होतील.

८) कथांमधून प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे व्यक्त झालेल्या लोकशाही मूल्याचा संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर होईल.

९) नेमलेल्या साहित्यकृतीच्या आधारे कथा घटकांचे आकलन होऊन कथा लेखनाची प्रेरणा मिळेल.

| अ.क्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | अध्यापन तासिका (Teaching Periods ) |
|---|---|---|
| १ | **मन निरभ्र व्हावं** : डॉ. आ. ह. साळुंखे, लोकायत प्रकाशन, सातारा. | एकूण – ७५ तासिका |
| २ | **कथावैभव (अर्वाचीन कालखंडातील निवडक कथा)**<br>संपादक - डॉ. गणेश मालटे, डॉ. गजानन मुंदे, डॉ. राजेश मिरगे<br>राघव पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर.<br>('कथावैभव' मधील क्रमांक ७ ते १२ या कथा अभ्यासक्रमात राहतील.) | |
| ३ | ‘मन निरभ्र व्हावं’ व ‘कथावैभव’ यावर आधारित कौशल्य विकास<br>(Skill Enhancement Module) | |

**बी. ए. भाग - २ सत्र - ४ विषय - मराठी वाङ्मय (ऐच्छिक)**

**गुण विभागणी**

| | |
|---|---|
| एकूण गुण - १००, लेखी परीक्षा - ८० गुण, वेळ - ३ तास | अंतर्गत मूल्यमापन - २० गुण |

अ) 'मन निरभ्र व्हावं' - ४० गुण
ब) 'कथावैभव' - ४० गुण

**प्रश्ननिहाय गुणविभागणी :-**

प्रश्न १ - संदर्भासह स्पष्टीकरण - २० गुण
('मन निरभ्र व्हावं' व 'कथावैभव' यांवर प्रत्येकी ०५ गुणांचे प्रत्येकी दोन संदर्भ विचारले जातील.)
प्रश्न २ - मन निरभ्र व्हावं : ०१ दीर्घोत्तरी प्रश्न - १२ गुण
प्रश्न ३ - मन निरभ्र व्हावं : ०१ लघुत्तरी प्रश्न - ०८ गुण
प्रश्न ४- कथावैभव : ०१ दीर्घोत्तरी प्रश्न - १२ गुण
प्रश्न ५ – कथावैभव : ०१ लघुत्तरी प्रश्न - ०८ गुण
प्रश्न ६- वस्तुनिष्ठ बहुपर्यायी २० प्रश्न, प्रत्येकी ०१ गुण - २० गुण
(वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांमध्ये 'मन निरभ्र व्हावं' यावर १० प्रश्न, 'कथावैभव' यावर १० प्रश्न विचारले जातील.)

**कौशल्य विकासावर आधारित अंतर्गत मूल्यमापन (Skill Enhancement Module) - २० गुण**

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या वाचन, लेखन कौशल्यांचा विकास करण्यासाठी पुढील मुद्यांच्या आधारे विद्यार्थ्यांकडून SEM (Skill Enhancement Module) तयार करून घ्यावे. SEM तपासून गुणदान करावे.

१) अभ्यासक्रमात नेमलेल्या 'मन निरभ्र व्हावं' या पुस्तकातील आवडलेल्या दोन ललित लेखांचे परीक्षण विद्यार्थ्यांनी प्रकल्प वहीमध्ये लिहावे.
२) 'मन निरभ्र व्हावं' या पुस्तकाचे सूक्ष्म वाचन करून त्यातील बोधवाक्ये, सुभाषितसदृश वाक्ये शोधणे, या वाक्यांचे विश्लेषण प्रकल्प वहीत लिहून आणावे.
३) अभ्यासक्रमात नेमलेल्या 'कथावैभव' या पुस्तकातील कथांमधील म्हणी, वाक्प्रचार यांचे विद्यार्थ्यांनी संकलन करून प्रकल्प वहीत लिहून आणावे.
४) अभ्यासक्रमात नेमलेल्या 'कथावैभव' पुस्तकातील एका कथेचे परीक्षण प्रकल्प वहीत लिहून आणावे.
५) अभ्यासक्रमात नसलेल्या पण आवडलेल्या एका कथेचे रसग्रहण करावे.
६) अभ्यासक्रमात नसलेल्या पण आवडलेल्या एका ललित लेखाचे रसग्रहण करावे.
७) आपल्या परिसरातल्या लोकभाषांमधील लोककथांचे संकलन करून त्या लोककथा प्रकल्प वहीत लिहून आणाव्या.

**गुण विभागणी** SEM प्रकल्प वही - १० गुण, SEM वर आधारित मौखिक परीक्षा - १० गुण.

* विद्यार्थ्यांना परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी लेखी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन मिळून किमान ४० गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.